International Multilingual Research Journal

**Vidyawarta**®

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Shri Dadapatil Rajale Shikshan Sanstha

## Dadapatil Rajale Arts & Science College,

Adinathnagar, Tal- Pathardi,
Dist-Ahmednagar 414505

NAAC Re-accredited "B" Grade

## One Day State level Seminar

24th January 2018, 25th Years of 73rd & 74th

# Constitutional Amendment's

Organized by
**Department of Political Science**

Sponsored by
**B.C.U.D.**
Savitribai Phule Pune University, Pune

**Dr. V. B. Bansode**
Coordinator

**Dr. R. J. Temkar**
Principal

Scanned with CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No.62759
Vidyawarta®
January 2018 Special Issue
01

# Vidyawarta™

## International Multilingual Research Journal

Dadapatil Rajale Educational Institution

Dadapatil Rajale Arts & Science College, Adinathnagar,
Tal- Pathardi, Dist-Ahmednagar 414505

NAAC Re-accredited "B" Grade

# One Day State Level Seminar

24th January 2018

# '25th Years of 73rd & 74th Constitutional Amendments'

**Sponsored by**

B.C.U.D.

Savitribai Phule Pune University, Pune

**Organized by**

Department of Political Science

**Dr. V. B. Bansode**
**Coordinator**

**Dr. R. J. Temkar**
**Principal**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com
विद्यावार्ता: Interdisciplinary Multilingual Refereed Journal Impact Factor 5.131 (IIJIF)

# || Index ||


01) 73 th and 74th Constitutional Amendment and Maharashtra
Harshvardhan S. Kolhapure, Latur || 10

02) 73rd And 74th Constitution Amendments and Women
Dr. Suresh Devare, Dr. Vilas Awari (HOD), Kopargaon || 16

03) POLITICAL PARTICIPATION AND REPRESENTATION OF WOMEN IN INDIAN POLITICS
Dr. Dudhkawade Suresh Ramji, Pune || 18

04) Position of Women in Indian Society
Dr. B. B. Tilekar, Ahmednagar || 22

05) ७३ व ७४ वी घटनादुरुस्तीची २५ वर्षे : एक विश्लेषणात्मक आढावा
प्रा. डॉ. विलास भारतराव बनसोडे, जि. अहमदनगर || 26

06) ७३ वी, ७४ वी राज्यघटनादुरूस्ती आणि महिलांचे राजकीय सक्षमीकरण एक चिंतन
प्रा.डॉ. भालेराव श्रीराम हनमंतराव, लातूर || 29

07) ७३ व ७४ वी घटनादुरुस्ती व महिलांचा राजकीय सहभाग : वास्तव
प्रा. डॉ. संजय वामनराव भोळे, शेंदुर्णी || 32

08) महाराष्ट्रातील ग्रामीण राजकारण आणि महिलांचा सहभाग
प्रा. डॉ. चंद्रकांत प्रभाकर काळे, जि. अहमदनगर || 35

09) ७३ वी व ७४ वी घटनादुरूस्तीची समर्पकता
प्रा. फलके अविनाश बी., जि.अहमदनगर || 37

10) ७३वी व ७४वी घटनादुरूस्तीची समर्पकता
प्रा. मिलिंद विठ्ठल खांदवे, तळेगाव दाभाडे || 42

11) स्थानिक स्वराज्य संस्था आणि ७३, ७४वी घटनादुरूस्तीचे महत्त्व
डॉ. बेग रेहानाआरा ईस्माइल, पाबळ || 46

12) ७३व ७४व्या घटना दुरुस्तीची समर्पकता
प्रा. डॉ. देशमुख सुभाष, श्री. तिजोरे महेंद्र, अहमदनगर || 49


https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

Scanned with CamScanner

**07**

# ७३ व ७४ वी घटनादुरुस्ती व महिलांचा राजकीय सहभाग: वास्तव

प्रा. डॉ. संजय वामनराव भोळे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
अ.र.भा.गरुड महाविद्यालय, शेंदुर्णी

**प्रस्तावना :**

१५ ऑगस्ट १९४७ साली भारताला स्वांतत्र्य मिळाले व त्या स्वातंत्र्यानंतर भारतातील सर्व सामान्य घटकांचा विकास होईल यासाठी भारतात लोकशाहीचा स्वीकार करुन तीच्या वास्तव अमंलबजावणीसाठी २६ जानेवारी १९५० साली भारताची स्वतंत्र राज्यघटना अंमलात आणली. या राज्यघटनेनुसार सर्व सामान्य मानसाला व शासनाला एक आचारसंहिता निश्चित करुन देण्यात आली. आणि अशा आचारसंहितेतून भारताचा विकास कसा साधता येईल व भारतातील स्त्री व पुरुषांना त्याचे हक्क व अधिकार कसे उपभोगता येतील याचा खऱ्यार्थाने प्रयत्न झाला. आशा परिस्थितीत भारताच्या लोकशाहीची वाटचाल चालू असताना. भारतामध्ये अनंत काळापासून चालू असलेली राजकीय, आर्थिक व सामाजिक विषमतेची दरी मात्र विकासाच्या दृष्टीने महत्तवाचा घटक वाटत होता. कारण लोकशाही ही केवळ राज्य पध्दती नाही तर ती एक जीवनपध्दती व्हावी असे भारतातील नेत्यांना म्हणजेच म. गांधी, पंडित नेहरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत होते. परंतु भारतामध्ये मात्र सार्वांगीण विषमतेची दरी विकासाच्या आड येत होती. त्यामध्ये स्त्री पुरुष विषमता हा घटक देखील तेवढाच महत्तवाचा होता. म्हणून त्या घटकांकडे देखील लक्ष देऊन भारतात स्त्रीयांना राजकारणात ५० टक्के आरक्षण मिळावे व स्थानिक स्वराज्य संस्थांतून भारताचा विकास व्हावा आणि लोकशाहीची बीजे सर्व रुजावी या अनुषंगाने १९९३ साली ७३ व ७४ वी घटनादुरुस्ती विधयेक संसदेत संमत करुन स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा मिळवून दिला. व महिलांच्या राजकीय सहभागाला खऱ्यार्थाने सुरुवात झाली.

स्वातंत्र्यानंतर भारताने राज्यघटनेच्या माध्यमातून लोकशाही, समाजवादी व धर्मनिरपेक्ष आणि विकेंद्रीत लोकशाहीचा तसेच सर्व नागरिकांना न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता निर्माण करण्याचे अभिवचन राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत दिले आहेत. लोकशाही विकेंद्रीकरण ही बाबा यशस्वी होण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण समजली जाते. विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून विविध स्तरावरील राजकीय संस्थांमध्ये सामान्यातल्या सामान्य माणसास सहभागी करुन घेण्यात येते व आशा सहभागामुळे त्या त्या स्तरावरील विविध प्रकारचे प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी मदत होत असते. पण असे असले तरी विकेंद्रीत लाकशाहीच्या दृष्टीने भारतीय राज्यघटनेने विशेषत: गाव, तालुका; जिल्हा किंवा शहर यांच्यासाठी कोणत्याच प्रकारच्या राजकीय संस्थांची राज्यघटनेत तरतूद केली नसून फक्त राज्यघटनेच्या चौथ्या भागातील अनुच्छेद ४० मध्ये पंचायतीचा उल्लेख पुढीलप्रमाणे केला आहे.

"राज्य हे ग्रामपंचायतीची सुसूत्रता लावण्यासाठी कार्यप्रवण होईल व त्यांना स्वराज्याचे मुलघटक म्हणून कार्य करण्यास समर्थ करणेसाठी आवश्यक असतील अशी शक्ती वा प्राधिकार बहाल करील."

१ मे १९६० रोजी मराठी भाषिक महाराष्ट्रात पंचायतराजची स्थापना करण्यापूर्वी काही समस्या जाणून घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाने वसंतराव नाईक याच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली. समितीने १९६१ ला आपला अहवाल महाराष्ट्र शासनाला सादर केला. व याला शासनाने मान्यता देली व त्याचे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ या कायदयामध्ये रुपांतर केले. आणि १ मे १९६२ पासून महाराष्ट्र पंचायत राज्याची सुरुवात झाली.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

१. ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीचे महत्व स्पष्ट करणे.

२. ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीतून महिलांना मिळालेले त्यांचे अधिकार व त्यांची वास्तवता स्पष्ट करणे.



Scanned with CamScanner

३. स्थानिक स्वराज्य संस्थांची वास्तव भूमिका स्पष्ट करणे.

४. स्त्रीयांचा राजकीय दृष्टीकोन व राजकीय सहभाग स्पष्ट करणे.

**७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीची वैशिष्टये:**

**७३ वी घटनादुरुस्ती**

१. त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था

२. ग्रामसभेची तरतूद २४३ नुसार गावासाठी

३. पंचायतराज संस्थांच्या कार्यकाळात समानता.

४. पंचायतराज संस्थांच्या संरचनेत एकसुत्रता.

५. राज्यघटनेत ११ वे परिशिष्ट समाविष्ट.

६. पंचायतराज संस्थांसाठी २४३ नुसार राज्य वित्त आयोगाची तरतूद.

**७४ वी घटनादुरुस्ती**

१. नागरी स्थानिक संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला.

२. महिलांना ३३ टक्के राजकारणात आरक्षण मिळाले.

३. लोकशाही सक्षमीकरणासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांपातळीवर प्रयत्न.

**महिला आरक्षणाची संकल्पना:**

विषमतावादी समाजातील शोषितांच्या पुनर्वसनासाठी तसेच समाजाच्या न्यायचीत पूर्नरचनेसाठी भारतीय राज्यघटनेने जरी सर्वांना समान अधिकार दिले असले तरी समाजातील अनुसूचित जाती, जमाती व मागासवर्गीय घटकांना प्रतिकूल परिस्थितीमुळे त्यांचा लाभ घेता येणार नाही. हे ओळखुन त्यांच्यासाठी काही संरक्षक तरतूदी केल्या आहेत.

याच आधारे भारतीय लोकशाहीमध्ये घेण्यात येणाऱ्या निर्णयप्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने व महिला सबलिकरणासाठी भारतीय शासनाने ७३ घटनादुरुस्ती करुन पंचायतीराज क्षेत्रात महिलासाठी ३३ टक्के आरक्षणाची तरतूद केली व यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांतील त्यांचा सहभाग लक्षणीय वाढला आहे. पंचायतराजच्या राजकारणामुळे एका बाजुला लोकशाहीकरणाची प्रक्रिया सुरु झाली आहे. तर दुसऱ्या बाजूला मतदारांपलीकडे राजकीय अस्तित्व नसलेल्या महिलांना उमेदवार महणून स्थान मिळत आहे. महिला आरक्षणामुळे महिलांच्या आरक्षणपूर्व मुळ सहभाला तडा गेला असून त्यांना आता आपल्या शक्तीची जाणीव होऊ लागली आहे.

**महिला आरक्षणाची उद्दिष्टे:**

कित्येक वर्षांपासून महिला दुय्यमत्वाचे जीवन जगत आले आहे. महिलांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले. स्वातंत्र्यानतंर लिखीत राज्यघटनेच्या माध्यमातून स्त्री पुरुष असा कोणताही भेदभाव न ठेवता कायदयाचे अधिराज्य या न्यायाने आधुनिक भारताची व समाजाची निर्मिती करण्याचे लेखी अभिवचन संविधानाच्या माध्यमातून आणण्यासाठी अनेक कायदे, कार्यक्रमव योजना आखल्या जात आहेत. त्यापैकी एक म्हणजे पचायंतीराजमधील महिला आरक्षणाची योजना होय.

**१. महिलांचा राजकीय सहभाग वाढविणे**

राजकीय सहभाग ही लोकशाही व्यवस्थेतील एक महत्वाची प्रक्रिया समजली जाते. समाजातील ५० टक्के संख्येने असलेल्या महिला राजकीय प्रक्रियेमध ये किती प्रमाणात सहभाग दर्शवितात किंवा त्यांना किती प्रमाणात सहभागाची संधी उपलब्ध करून दिली जाते. हा एक संशोधनाचा मुददा आहे.

**२. दुर्बल घटकांना प्रतिनिधित्व देण्याच्या दृष्टीन प्रयत्न.**

आज अनेक मागासघटकांना संधी देण्याचा प्रयत्न या आरक्षण धोरणाच्या माध्यमातून झालेला आहे.

**३. सामाजिक न्याय प्रस्थापित करणे**

भारतीय लोकशाहीचा आधार असल्याने पंचायतराजमध्ये महिला आरक्षण देण्याचा उद्देश म्हणजे भारतीय समाजात न्याय प्रस्थापित करणे होय. भारतासारख्या बहुजिनसी समाजात लोकसहभाग घेतांना न्यायबुध्दी जागी ठेवून उपाययोजना करणे आवश्यक असते. सत्ता काबीज करण्यासाठी जातीधर्माच्या आधारावर प्रचार केला जातो. आणि गर्भश्रीमंत किंवा बहुसंख्यांक लोक आपली राजकीय मक्तेदारी निर्माण करतात. अशा परिस्थितीत सत्तेपासून वंचित राहिलेल्या गटांना पर्यायाने महिलांना आरक्षण देणे आवश्यक होते.



Scanned with CamScanner

### ४. ग्रामीण विकासाला चालना

आज स्वतंत्र भारताच्या लोकशाहीचा आलेख उंचावत आहे. लोकशाहीच्या यशस्वीतेत महिलांचा सिंहाचा वाटा आहे. व्यक्तिगत जीवनात ज्या प्रमाणे स्त्री शिवाय पुरूषाला पूर्णत्व नाही. त्याचप्रमाणे राष्ट्रीय जीवनातही स्त्री सहभागाशिवाय ग्रामीण विकास होऊ शकत नाही. म्हणून महिलांना ३३ टक्के आरक्षण देऊन ग्रामीण विकासाला चालना देण्याचा प्रयत्न केला आहे.

### ५. महिला आरक्षण व पंचायतराज

लोकशाहीचे मूळ हे पंचायतराज आहे. लोकशाही दृढ करण्यासाठी पंचायतराज संस्थांमध्ये समाजातील एकूण लोकसंख्येपैकी निम्मी लोकसंख्या असलेल्या महिलांना सहभागी करून घेतल्याशिवाय पर्याय नाही. म्हणूनच १९९३ ला ७३ व ७४ व्या घटनादुरूस्तीला मान्यता मिळाली आणि महिलांना पंचायतराजच्या त्रिस्तरीय रचनेनुसार जिल्हा परिषद पंचायत समिती आणि ग्रामपंचायत मध्ये ३३ टक्के आरक्षण देण्याचा कायदा लागू झाला. तेव्हा पासूनच खऱ्यार्थाने भारतामध्ये ग्रासरूट लोकशाहीची सुरूवात झाली आणि भारतातील तळागाळातील स्त्रीयांना पंचायतराज संस्थांमध्ये राजकीय संहभाग मिळून राजकारणात अनेक पदावर सेवा करण्याची संधी मिळत आहे.

### महिलांचा राजकीय सहभाग व आरक्षण फलनिष्पत्ती/ निष्कर्ष

भारतीय स्वातंत्र्यानंतर महिलांचा राजकीय विकास व सहभाग घडवून आणण्यासाठी पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त करून देण्यासाठ‍ महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यासाठ‍ ७३ वी घटनादुरूस्ती करण्यात आली. ही घटनादुरूस्ती करण्यात आली. ही घटनादुरूस्ती करून महिलांच्या आरक्षणाला कायदेशीर अधिकार दिले आणि पंचायतीराज संस्थंतील महिलांचा राजकीय सहभाग वाढविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आला आहे.

परंतु असे असले तरी आजच्या बदलत्या काळ्यात पुरूषप्रधान संस्कृतीमुळे महिलांची भूमिका देखील अन्यायविरूध्द झगडण्याची असणे ही काळाची गरज आहे. म्हणूनच सामाजिक, राजकीय, परिवर्तन घडवून आणण्यासाठी स्त्री पुरूष हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. याला महत्व आले आहे. म्हणूनच ७३ व्या शतका मध्ये भारताच्या लोकशाही सक्षमीकरणासाठी महिलांचा राजकीय सहभाग केवळ नामधारी असून चालणार नाही. तर राजकीय व्यवस्थेमध्ये महिलांच्या राजकीय सहभागाबरोबरच राजसत्तेतील अधिकार मुद्दा असणे आवश्यक आहे. असे असले तरी आजच्या बदलत्या काळात भारताच्या लोकशाहीमध्ये स्त्री पुरूष अधिकाराची विषमतेची दरी आजही भारताच्या सर्वांगीण व्यवस्थेमध्ये बऱ्याच प्रमाणात असल्याची दिसून येते हे चित्र बदलणे आधुनिक लोकशाहीची खरी गरज आहे.

### संदर्भ

१. डॉ. शुभांगी राठी, भारतीय संविधानाची ओळख, अथर्व प्रकाशन, धुळे

२. डॉ. शुभांगी राठी, महाराष्ट्रातील सामाजिक राजकीय चळवळी व प्रशासन, अर्थव प्रकाशन, धुळे

३. डॉ. रेखा वानखेडे संपा

४. डॉ. विजय तुंटे, प्रशांत प्रकाशन, जळगाव, प्रथमावृत्ती २०१३

❑❑❑



Scanned with CamScanner









**Published By**

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126
**(Maharashtra) Mob.09850203295**
E-mail: vidyawarta@gmail.com
**www.vidyawarta.com**

**ISSN-2319 9318**

Scanned with CamScanner